SJSB
Multi-State Scheduled Bank

सोलापूर जनता सहकारी बँक लि.
50
सुवर्ण महोत्सवी वर्ष
२०१५-१६

# श्रीकृष्ण तथा किशोर अ. देशपांडे

एम.ए., एम.एस.डब्ल्यू,
माजी महापौर

• अध्यक्ष : सोलापूर जनता सहकारी बँक लि., सोलापूर-७.
• अध्यक्ष : सुवर्ण महोत्सव समिती, सोलापूर जनता सह. बँक लि.,सोलापूर.

• निवास : विश्वकर्मा अपार्टमेंट,'बि विंग' फ्लॅट नं. २०२, डि. आय.सी. जवळ, होटगी रोड, सोलापूर-३., दूरध्वनी क्र. : ०२१७ २६००९६०, भ्रमणध्वनी : ९४२२०६८४०७, ई-मेल : kishord307@gmail.com

अध्यक्ष



श्रीकृष्ण तथा किशोर देशपांडे

सप्रेम नमस्कार,

सोलापूर जनता सहकारी बँक हे वर्ष सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करीत आहे. त्यानिमित्त विविध उपक्रम करण्याचे बँकेच्या संचालक मंडळाने ठरवले आहे. या उपक्रमापैकीच एक उपक्रम म्हणजे महाराष्ट्र राज्यातील नागरी सहकारी बँकांची राज्यव्यापी परिषद घेण्याचे योजले आहे. या संबंधीचे एक पत्र मी आपणांस या पूर्वीच दि. २४.०८.२०१५ रोजी पाठविले आहे.

दि.१२ व १३ डिसेंबर २०१५ रोजी होणाऱ्या या परिषदेस उत्स्फूर्त असा प्रतिसाद सर्व जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचे प्रतिनिधीकडून मिळत आहे. त्याबद्दल सर्वांचे धन्यवाद !

या परिषदेच्या अनुषंगाने या पत्रासोबत सोलापूर शहरांतील वास्तव्यासाठी उपलब्ध असलेल्या सर्व हॉटेल/ लॉजेसची सुची व दरपत्रकही पाठवले आहे. तसेच शहराच्या परिसरातील प्रेक्षणीय व धार्मिक स्थळांची यादी ट्रॅव्हल एजन्सीजची माहिती. इ. पाठविली आहे. त्याचे अवलोकन करावे.

परिषद संबंधीच्या महत्वाच्या सूचना सोबत जोडल्या आहेत. त्या लक्षात घेतल्यास परिषदेच्या आयोजनात मोठे सहकार्य लाभेल व परिषदेत येणाऱ्या मान्यवरांचे सोलापूरातील दोन दिवसांचे राहणे सुखकारक करण्याचा आमचा प्रयत्न यशस्वी होईल. त्यावर आपण सकारात्मक प्रतिसाद द्याल ही अपेक्षा आहे.

या परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्री मा. ना.श्री. सुधीरजी मुनगंटीवार यांचे शुभहस्ते व नितीआयोगाचे उपाध्यक्ष मा. श्री. अरविंदजी पनगरीया यांच्या उपस्थित होणार आहे. तसेच समारोप महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील हे करणार आहेत.

सहकार परिषदेस सहकार क्षेत्रातील अनेक मान्यवर मंडळींनी येऊन आपला सहभाग देण्याचे मान्य केले आहे. परिषद दि. १२ डिसेंबर २०१५ रोजी दु. २.०० वाजता सुरु होईल व दि. १३ डिसेंबर २०१५ रोजी भोजनोत्तर संपेल.

परिषदेत चर्चेस येणारे विषय व त्यांची सूची व वक्ते यांची माहिती लवकरच आपणांस दिली जाईल.

ही परिषद सहकार क्षेत्रास एक दिशा दर्शक ठरावी असा संयोजकांचा मानस आहे. त्या दृष्टीने सर्व सत्र अभ्यासपूर्वक व तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शनाखाली व्हावीत असा प्रयत्न आहे.

आपण या सहकार परिषदे उपस्थित राहून आमचा आनंद द्विगुणीत करावा ही विनंती दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

आपला,

(श्रीकृष्ण तथा किशोर देशपांडे)
अध्यक्ष, सुवर्ण महोत्सव समिती
चेअरमन ,सोलापूर जनता सहकारी बँक लि., सोलापूर.

SJSB Multi-State Scheduled Bank सोलापूर जनता सहकारी बँक लि; सोलापूर. (मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)

मुख्य कार्यालय : 'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर. फोन. (०२१७) - २७४११०० ते ०५, website - www.sjsbbank.com, Email - info@sjsbbank.com

# • परिषदेसंबंधी सूचना •

## • निवास विषयक

१) सर्व मान्यवरांनी निवासाची व्यवस्था आपण स्वतः अथवा आपल्या संस्थेमार्फत करावयाची आहे.
२) सोलापूरातील ५० हॉटेल / लॉजेसची सूची या सोबत जोडली आहे.

आपण शक्य तितक्या लवकरात लवकर आपले राहण्याचे हॉटेलचे आरक्षण करुन घ्यावे म्हणजे आपली गैरसोय होणार नाही. केलेल्या आरक्षणांसंबधी आमच्या कार्यालयास सूचना दिली म्हणजे आमचे प्रतिनिधी आपल्या स्वागतासाठी संबधित हॉटेलमध्ये उपस्थित राहतील.

## • आरक्षण

सोलापूर येथे रेल्वेने अथवा एस.टी.ने येता येते. आपण आपले येण्या-जाण्याचे आरक्षण करुन आलात तर आम्ही आपले आभारी राहू. तरीही आपण आपल्या आरक्षणसंबंधीच्या सूचना किमान १५ दिवस अगोदर कळवाव्यात. आम्ही ती सेवा पुरवणार आहोत. ऐनवेळी आरक्षण मिळणे अवघड होऊ शकते तरी कृपया योग्य वेळी त्याची सुचना द्यावी.

## • प्रेक्षणीय स्थळे

सोलापूर शहराच्या जवळ असणाऱ्या प्रेक्षणीय स्थळांची यादी सोबत जोडली आहे. तसेच ट्रॅव्हल्स एजंटांची यादी सोबत जोडली आहे. आपण त्याचा लाभ घ्यावा. यासंबंधी अन्य काही माहिती अथवा सेवा हवी असल्यास बँकेस दूरध्वनीवरुन कळविल्यास आमचे स्वयंसेवक आपल्या सेवेत आहेतच.

## • भोजन

सहकार परिषद दि. १२ डिसेंबर २०१५ रोजी दुपारी २.०० वाजता सुरु होणार आहे. दि. १२ डिसेंबर रोजी आपण येणार याची पूर्वसूचना दिले तर बरे होईल. दि. १२ रोजी दुपारी १२ ते २ भोजन व्यवस्था अधिवेशन स्थळी करण्यात आली आहे. दि. १२ व १३ रोजीच्या अल्पोपहार, भोजन इत्यादी व्यवस्था संयोजकांच्या वतीने आपल्यासाठी करण्यात येणार आहे. याचा लाभ घ्यावा. दि. १३ रोजी भोजनोत्तर परिषद संपणार आहे.

## • शॉपींग

सोलापूर शहर हे चादर/टॉवेल याकरिता प्रसिध्द शहर आहे. येथे मोठ्याप्रमाणात त्याचे उत्पादन केले जाते. निर्यातक्षम दर्जाचे उत्पादन येथे होते. आपण पूर्वसूचना दिल्यास आपल्या खरेदीसाठी स्वयंसेवक आपल्या सहाय्यासाठी आहेतच आपण उत्पादन क्षेत्र व शोरुमला भेट देऊ शकता. त्यासाठी आमची टीम आपल्या स्वागतासाठी सज्ज आहे.

## • यातायात

सर्व हॉटेलपासून परिषदेस येण्यासाठी संयोजकांच्या वतीने व्यवस्था करण्यात येणार आहे. आपणांस या सेवेचा लाभ घ्यावयाचा असल्यास पूर्वसूचना आपण आम्हांस द्यावी. धार्मिक स्थळांच्या ठिकाणी आपणास निवासाची व्यवस्था हवी असल्यास त्यास आम्ही मदत करु तशी पूर्वसूचना आपण देण्याचे करावे.

परिषदेस आपण येत असल्याचे संमती पत्र या कार्यालयास दि. १५ नोव्हेंबर पर्यंत प्राप्त व्हावे अशी अपेक्षा आहे.
आपल्या संस्थेच्यावतीने अध्यक्ष/ उपाध्यक्ष/ ज्येष्ठ संचालक / मुख्य कार्यकारी अधिकारी या परिषदेस अपेक्षित आहेत.

आपण आपला सहभाग लवकरात लवकर आम्हास नोंदणीद्वारे कळवावा.
ही विनंती.

SJSB

Multi-State Scheduled Bank

# सोलापूर जनता सहकारी बँक लि; सोलापूर.

(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)

## आपले सहर्ष स्वागत...!

# राज्यव्यापी सहकार परिषद

- दिनांक : १२ व १३ डिसेंबर २०१५ रोजी
- शुभारंभ वेळ : दुपारी - ३.०० वाजता.
- कार्यक्रम स्थळ : हेरिटेज गार्डन - १४/५, सिव्हील लाईन, गांधी नगर चौक, सोलापूर.

आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

धन्यवाद